---ि नागिन पत्रिका नाशिक

# प्रेसनोट

नाशिक,
दि. २२/०६/२०२२

आलोसे क्र. १) महेंद्र श्रावण चव्हाण, सहायक अभिंयता, वर्ग–२, म.रा.वि.वि. मर्या. कंपनी मनमाड,जि. नाशिक व क्र.२) कुणाल दादा ठाकरे (खाजगी इसम) धंदा–कंत्राटदार, रा. शिक्षक कॉलनी, चांदवड रोड, मनमाड, ता. नांदगाव, जि.नाशिक, ३) अंकुश मोठाभाउ दुकळे, (खाजगी इसम) धंदा–कंत्राटदार, रा. मु.पो. झारी, ता. मालेगाव, जि. नाशिक यांना २०,०००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना अटक करून त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये कारवाई केलेबाबत..

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | मनमाड शहर पोलीस ठाणे, जि. नाशिक ग्रामिण, गुरनं.१५८/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७अ, १२ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | आलोसे क्र. १) महेंद्र श्रावण चव्हाण, सहायक अभिंयता, वर्ग २, म.रा.वि.वि. मर्या. कंपनी मनमाड<br>२) कुणाल दादा ठाकरे (खाजगी इसम) धंदा–कंत्राटदार, रा. शिक्षक कॉलनी, चांदवड रोड, मनमाड, ता. नांदगाव, जि.नाशिक,<br>३) अंकुश मोठाभाउ दुकळे, (खाजगी इसम) धंदा–कंत्राटदार, रा. मु.पो. झारी, ता. मालेगाव, जि. नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | **२०,०००/– रूपये** |
| थोडक्यात माहिति | यातील तक्रारदार यांनी त्यांचे राहते घरावर म.रा.वि.वि. कं. मर्या. यांनी बांधलेल्या अनधीकृत विजेच्या तारा काढुन घ्याव्यात यासाठी महावितरणचे आलोसे क्रमांक १ महेंद्र श्रावण चव्हाण यांची भेट घेतली असता चव्हाण यांनी कायदेशीर काम न करता खाजगी इसम कुणाल दादा ठाकरे व अंकुश मोठाभाउ दुकळे यांना तक्रारदार यांचेकडुन लाच घेण्यासाठी प्रोत्साहित केले. तसेच खाजगी इसम कुणाल दादा ठाकरे यांनी स्वत: व लोकसेवक श्री. चव्हाण यांचेसाठी २०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले.<br>अशाप्रकारे आलोसे क्र.१ महेंद्र श्रावण चव्हाण, सहायक अभियंता, म.रा.वि.वि.मर्या.कंपनी मनमाड, यांनी स्वत:चे पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन स्वत:चा सांपत्तीक फायदा करुन घेण्याचे हेतुने कायदेशिर परिश्रमिकेखेरीज अन्य पारितोषण म्हणुन खाजगी व्यक्ती कुणाल दादा ठाकरे व अंकुश मोठाभाउ दुकळे यांना लाच घेण्यासाठी प्रोत्साहीत केली. त्याचप्रमाणे खाजगी इसम कुणाल ठाकरे व अंकुश दुकळे यांनी लाचेची मागणी करुन भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने तक्रारदार यांचेवर लोकसेवक चव्हाण यांचे ओळखीचा प्रभाव पाडून पैशांच्या स्वरूपात तक्रारदार यांचेकडुन खाजगी इसम कुणाल ठाकरे यांनी २०,०००/– रू लाचेची रक्कम यांनी स्विकारताना त्यानां पकडण्यात आल्याने त्यांचेविरूध्द मनमाड शहर पोलीस ठाणे, जि. नाशिक ग्रामिण, गुरनं. १५८/२०२२ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७अ, १२ प्रमाणे दि. २३/०६/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :– | ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक |
| संकेतस्थळ | :– | acbmaharashtra.gov.in |
| ई–मेल | :– | spacbnashik@mahapolice.gov.in |
| ऑनलाईन तक्रार | :– | acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक | :– | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :– | ०२५३–२५७५६२८, २५७८२३० |
| व्हॉट्स ॲपक | :– | ९९३०९९७७०० |


(सतिश भामरे)
वाचक पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक.

Scanned with CamScanner